कृषि विस्तार शिक्षण विभाग ,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला-४४४१०४.

---

जा .क्र.कृविशी/११९/२०२६.
दि.१८/०६/२०२६.

# लिलाव सूचना

विभाग प्रमुख, कृषी विस्तार शिक्षण डॉ. पंदेकृवि, अकोला. या कार्यालयाचे भांडारातील निरुपयोगी प्रयोगशाळा साहित्य लोखंडी आणि लाकडी साहित्याचा जाहीर लिलाव दि. ०७/०७/२०२१, रोजी दुपारी ३:०० वाजता कृषी विस्तार शिक्षण डॉ. पंदेकृवि, अकोला येथे करण्यात येणार आहे. तरी सदर निरुपयोगी प्रयोगशाळा साहित्य लोखंडी आणि लाकडी साहित्य ज्यांना विकत घ्यायचे असतील त्यांनी लिलावाच्या वेळी लिलावाच्या अटी व शर्ती मान्य असल्यास अनामत रक्कम रु. २०००/- भरून नोंदणी करावी. सोबत आधार कार्ड प्रत सादर करावी. कार्यालयीन वेळेत साहित्य पहावयास मिळतील. सदर नियम अटी व शर्ती विद्यापीठाच्या www.pdkv.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

विभाग प्रमुख,
कृषी विस्तार शिक्षण
डॉ. पंदेकृवि, अकोला.

# लिलावाच्या अटी व शर्ती

१) लिलावात निघालेले भंगार निरुपयोगी वस्तू , प्रयोगशाळा साहित्य, लोखंडी आणि लाकडी साहित्य यांचा लिलाव जसे आहे जिथे आहे या तत्वावर होईल.

२) जुन्या भंगार साहित्याचा लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.

३) ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी दि. ०७/०७/२०२६ रोजी सकाळी १२ वाजेपर्यंत रोखीने रक्कम भरणा करावे. १२ वाजल्यानंतर कुठलीही अनामत रक्कम स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ज्यांनी अनामत रक्कम दि. ०७ /०७/२०२६ रोजी दुपारी १२ पर्यंत भरली असेल त्यांनाच बिडर नंबर देण्यात येईल व त्यांनाच लिलावात भाग घेता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.

५) लिलाव समितीचे सदस्य व संबधित कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरीक्षण करतील.

६) लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल व त्यांना लिलावाची बोली म्हणून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठीत समिती घेईल.

७) अपेक्षित किमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.

८) साहित्याची बोली कायम झाल्यास व सदर वस्तूच्या किमती कायम झाल्यास किमतीच्या ५०% रक्कम त्याच दिवशी व उर्वरित ५०% रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासून तीन दिवसात भरावी लागेल. रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

९) बोली कायम झाल्यास संबंधीत व्यक्तींनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करावे व वाहून नेण्याची त्यानतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्यांची स्वतःची असेल.

१०) लिलाव झालेल्या साहित्याची पूर्ण किमत भरल्यानंतर सदर वस्तू खरेदी दाराने ३ दिवसाच्या आत विद्यापीठ परिसरातून स्वताच्या ताब्यात घ्यावी. अन्यथा सदर साहित्याची देखभालीची व गहाळ झाल्यास विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

११) ज्यांची बोली अमान्य ठरली असेल त्यांना अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१२) साहित्याची वाहतूक करताना विद्यापीठातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी खरेदीदाराची असेल.

१३) लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी. अन्यथा तक्रारीचा विचार केला

जाणार नाही. लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्वीकृत करण्यात येणार नाही.

१४) लिलावात काही अडचणी अथवा वादविवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

१५) लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

१६) लोखंडी साहित्याची विक्रीची बोली प्रति किलो दराप्रमाणे राहील. यामध्ये निरुपयोगी वस्तू, प्रयोगशाळा साहित्य, लोखंडी व लाकडी साहित्य इतर पातळ किवा जाड लोखंडी साहित्याचा समावेश राहील तसेच प्रत्यक्ष रक्कम अंतिम वजन परिमाणानुसार भरावी लागेल. सदर साहित्य उचल करणे, हमाली व वाहतुकीची जबाबदारी घेणाऱ्यांची राहील. तसेच वजन करणेची व त्यासाठी खर्चाची जबाबदारी सुद्धा राहील.

विभाग प्रमुख,
कृषी विस्तार शिक्षण
डॉ. पंदेकृवि, अकोला.

Inward No. 190
Dt. 3G/8/22
Dr. P.D.K.V. Akola